# संपादकांचे मनोगत



**नमस्कार,**

लोकशाही माध्यम समूहाचे वाचक, दर्शक, जाहिरातदार, विक्रेते, लेखक, हितचिंतकांना प्रकाशपर्वाच्या मनस्वी हार्दिक शुभेच्छा! सणांचा राजा म्हणून ओळखल्या जाणाऱ्या दिवाळीनिमित्त दरवर्षाप्रमाणे यावर्षी देखील दै. लोकशाहीचा '**लोकारोग्य**' हा विशेषांक आपल्या हाती देतांना अतिशय आनंद होत आहे. परंपरेप्रमाणे दै. लोकशाही सर्वांच्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी '**लोकारोग्य**'विशेषांकाच्या माध्यमातून सज्ज आहे.

'**लोकारोग्य**'च्या माध्यमातून नागरिकांचे '**नित्यारोग्य**' कसे असावे या विषयाला '**स्पर्श**' केला आहे. दैनंदिन आरोग्याला अनन्य साधारण महत्त्व आहे. धावपळीच्या युगात आपल्याकडून कळत न कळत आरोग्याकडे दुर्लक्ष होते, ते टाळण्यासाठी काय उपययोजना कराव्यात, कुठले पथ्य पाळावेत यावर या विशेषांकाच्या माध्यमातून प्रकाशझोत टाकण्यात आला आहे. सन २०२४ च्या दिवाळी विशेषांकाचे वैशिष्ट्ये देखील आगळेवेगळे आहे. निरामय आरोग्यासाठी मन:शांती, मेंदूंचे आरोग्य, सुदृढ आरोग्याची गुरुकिल्ली यासह आरोग्यासंदर्भात विविध लेख, साहित्य, काव्य, कार्टून्स यांची मेजवानी आहेच. दै. लोकशाही सातत्याने समाजहिताला प्राधान्य देत राहिली आहे. प्रिंट मीडियापासून इलेक्ट्रॉनिक मीडियापर्यंतचे सर्व दालने लोकशाही माध्यम समूहाच्या माध्यमातून जनसामान्यांचा आवाज बुलंद करीत आहे. आपल्या सर्वांच्या प्रेमामुळेच हा वेलू गगनावरी जात आहे. आपले प्रेम आहेच ते अधिक वृद्धींगत व्हावे हीच अपेक्षा! पुनश्च आपणास दिपावलीच्या लक्ष लक्ष शुभेच्छा!!!

सौ. शांता वाणी
**संपादिका**
**मो. ९४२१५२१४९१**